भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र ८१९ / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०९/२०१७

**१) संगनमत करुन महिलेला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २३/०८/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील फिर्यादी हा आपले घरी हजर नसतांना फिर्यादीची पत्नी हिला आरोपी क्र.० १ ने फुस लावुन पळवुन नेवुन फिर्यादी हा पत्नी बाबत वारंवारं आरोपी क्र. १ यास विचारपुस करीत असता तुझी पत्नी येणार आहे. असे खोटे नाटे सांगुन दिंनाक ०२/०९/२०१७ रोजी फोनवरुन फिर्यादीस २५,०००/–रु. घे तुझी पत्नी येवु शकत नाही असे बोलले, यावरुन आरोपी क्र. १ ने आरोपी क्र. २, ३, ४ सोबत संगनमत करुन फिर्यादीची पत्नी हिला कोणत्यातरी इसमाकडे विक्री केली असावी, असा संशय व्यक्त केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३,३७०(१)(अ)(३),३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. रेवतकर पो.स्टे साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) महिलेला मारहान, ओढतान, व नखाने ओरबडुन विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०४/०९/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी ही हनुमान मंदीर येथे गणपतीचा महाप्रसाद खाण्याकरीता गेली असता महाप्रसाद घेवुन मंदीरा बाहेर हात धुत असतांना यातील आरोपीने फिर्यादीस पाहुण अश्लिल शब्दात बोलल्याने फिर्यादीने हटकले असता, आरोपी हा फिर्यादी जवळ येवुन मारण्यास धावल्याने तिने त्याच्या गालावर थापड मारली तिथे आरोपीने आपल्या आईला बोलावुन मुलाच्या आईने माझ्या मुलाला कशाला मारहान केली असे बोलली असता आरोपीने फिर्यादीचा हात पकडुन ओढतान करुन बेईज्जत केले व हाताने, नखाने ओरपडुन धमकी दिल्याने फिर्यादी तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४,३२३,५०६भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फुकट पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**३) भांडण करुन महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०४/०९/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील आरोपी हा फिर्यादीचे शेतावर आपले गाई म्हशी चारतांनी दिसला असता, फिर्यादीने त्यास हटकले असता, आरोपी याने भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तुम्हाला पैश्याची गरमी चढली आहे. असे बोलुन व साक्षदारासमोर धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उके पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन अज्ञात ईसामांनी मोटार सायकल अडवुन जबरीने नगदी पैसे व मोटार सायकलची घेवुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०४/०९/२०१७ चे १९.३० वा दर. यातील फिर्यादी अमीराज जयपाल डोंगरे वय २६ वर्ष, रा. खमारी बु. हा आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६ एएन ५०५३ पॅशन प्रो लाल रंगाची ने टेकेपार वरुन खमारी येथे गावी जात असतांना एनएच ०६ रोड जवळील पलाटी फाटया जवळ यातील अनोळखी चार आरोपी ईसमांनी संगनमत करुन अडवुन बरमोडयाच्या खिश्यातील नगदी २०,०००/–रु. व मोटार सायकल किंमती २०,०००/–रु. असा एकुण ४०,०००/–रु. चा माल जबरीने हिसकावुन घेवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे कारधा येथे कलम ३९२,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) सिबी झेड मोटार सायकलच्या धडकेत दोन मुलींना जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/०९/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी नैना अनुध्वज गजभिये वय २० वर्ष, रा. खमारी ही आपली मैत्रीण गायत्री बोदरे सोबत मेस्ट्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ ही ८३२४ ने लाखनी कडुन भंडारा कडे एनएच ०६ रोडने येत असता, मागेहुन येणाऱ्या यातील सिबीझेड गाडीचे आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला ओव्हरटेक करुन धडक दिल्याने फिर्यादी व तिची मैत्रीण हिला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची माहिती पोस्टेला न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका . अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**६) घरातुन सोन्याचा मंगळसुत्र व नगदी पैश्याची चोरी. :—**

दिनांक ०४/०९/२०१७ चे १०.३० ते ११.३० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराला लावलेल्या समोरील दाराचा उजव्या बाजुचा पट कुलाब्यातुन काढुन आत प्रवेश करुन आलमारीत ठेवलेला १ सोन्याचा मंगळसुत्र व नगदी १५,०००/—रु. असा एकुण २३,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी रविन्द्र गोमाजी तरारे वय ३६ वर्ष, रा. रनेरा ह. मु. सालई बु. यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. म्हसकर पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**७) उभा असेलेल्या ट्रॅक्टरला लावलेली बॅटरीची चोरी. :—**

दिनांक ०४/०९/२०१७ चे ००.०१ ते ९.३० वा. पुर्वी. यातील फिर्यादी रोशन बिहारीलाल जांगडे वय ५० वर्ष, रा. राजीव नगर बेला यांचे घरा समोरील खुल्या जागेत उभा असलेला ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल १३४१ ला लावलेली अपोलो मेक कंपनीची बॅटरी किंमती ४,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने काढुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गभने पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**८) नदीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०४/०९/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रल्हाद मारोती कोचे वय ५८ वर्ष रा. विहीरगाव पोलीस पाटील यांनी मोबाईल फोन व्दारे खबर दिली की मृतक विनोद वालकु वलथरे वय ३० वर्ष, रा. विहीरगाव हा गावा पासुन ०.५ किमी अंतरावर असलेल्या चुलबंध नदीवर मासोळी पकडण्यास गेला असता, नदीचे पाण्यात बुडुन मरण पावला त्यास पाहण्यास १९.३० वा. गेला असता मृतकचे प्रेत पाण्याबाहेर काढले व तो मरण पावलेल्या स्थितीत असल्याने, या खबरेवर व पीएसओ साहेब यांचे तोंडी ओदशावरुन पो. स्टे. पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत

**९) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०४/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे कारधा, करडी, तुमसर, गोबरवाही व पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून ६३ लिटर १८० मिली लिटर हा.भ. दारू किंमती ४,४१०/–रु. व १२ लिटर ६०० मिली लिटर देशी दारु + मोटार सायकल किंमती १३,४८४/–रु. असा एकुण किंमती १७,८९४/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०४/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १११ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०५, तीन सिटर वाहनांवरती १८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८८ केसेस करण्यात आलेल्या आहे.

**(एस. व्ही. कुलकर्णी )**
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता